# खार पोलिसांचे रस्ता सुरक्षा अभियान



**वांद्रे :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे व नागरी जबाबदारीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी खार पोलीस ठाण्याच्या वतीने आयोजित केलेल्या उपक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी आणि लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान यांच्या पुढाकाराने नागरिकांसाठी रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, उर्विल जानी, डॉ. निवेदिता श्रेयंस तसेच मुंबईतील विविध नागरिक मंचांचे प्रतिनिधी उपस्थित होते. समाजातील सक्रिय सहभाग व सामूहिक बांधिलकीचे दर्शन यातून घडले. कार्यक्रमांतर्गत ध्वजारोहण समारंभ, उद्घाटनपर भाषण, तसेच प्रतीकात्मक हेल्मेटचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमातून जबाबदार वाहनचालकांना व रस्ता सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. नागरिक व पोलीस अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमास लाभला. सुरक्षित रस्ते घडवण्यासाठी व जबाबदार नागरिकत्व वाढीसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे अक्षत खेतान यांनी यावेळी सांगितले.